**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.) मुंबई या महामंडळास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता व्यवस्थापकीय अनुदान (३६-सहायक अनुदाने-वेतन) मंजूर करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- संकिर्ण-२०१७/प्र.क्र.२७२/महामंडळे**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :-१६ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- १) सा.न्या. व वि.स. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.२७२(२)/महामंडळे, दि.१९.०६.२०१७
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८
३) शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : बीजीटी-२०१७/प्र.क्र.७१/ अर्थसंकल्प, दि.०७.०२.२०१८.
४) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचे पत्र क्र.एसएलएएसव्हीएम/व्यंस/वित्त/एचओ-२७९५/१७-१८, दि.१४.१२.२०१७

**शासन निर्णय** :-

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई मार्फत मातंग समाजाच्या आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.२,५२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी बावन्न लक्ष फक्त) आणि **३६-सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.१०,८६,००,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी शहाऐंशी लक्ष फक्त)** अशी एकूण रु.१३,३८,००,०००/- (अक्षरी रुपये तेरा कोटी अडतीस लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

२. सदर ३६-सहायक अनुदाने (वेतन) यासाठी केलेल्या रु.१०,८६,००,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी शहाऐंशी लक्ष फक्त) अर्थसंकल्पित तरतूदीपैकी संदर्भ क्र.१ अन्वये ८० टक्केच्या मर्यादेत रू. ८,६८,८०,०००/-(अक्षरी रू.आठ कोटी अडुसष्ट ऐंशी हजार फक्त) एवढी तरतूद वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. **संदर्भ क्र.२ व ३ अन्वये एकूण मंजूर अनुदानाच्या १०० % च्या मर्यादेत उर्वरीत कालावधीकरिता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.२१७२०,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी सतरा लक्ष वीस हजार फक्त) एवढे व्यवस्थापकीय अनुदान वितरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-**

i) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
ii) व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.
iii) विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.
iv) महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.

v) कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

vi) सदरचा निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकारी नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना व प्रचलित निकष , वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन तसेच वित्त विभागाच्या दि.१८, एप्रिल,२०१७,दि.३०, जून,२०१७, दि.०८, ऑगष्ट,२०१७, दि.२९, जानेवारी,२०१८ व दि.०१, फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. वरील अनुदानाबाबत सह सचिव/ उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाही करिता प्रादेशिक उपायुक्त, मुंबई समाजकल्याण, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

४. या बाबींवरील खर्च “मागणी क्रमांक एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ अनुसूचीत जातीचे कल्याण, ८०० इतर खर्च (१०) (०१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांना सहायक अनुदाने (२२२५ २३१७) ३६-सहायक अनुदाने (वेतन)” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६, फेब्रुवारी, २०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१६१३०३०६३८२२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.02.16 13:10:01 +05'30'

**( अ.कों.आहिरे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सह सचिव/उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
४) व्यवस्थापकीय संचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.) मुंबई

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई,/ठाणे.
८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९) अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
१०) वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
११) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई,
१२) कार्यासन-अर्थसंकल्प, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१३) निवड नस्ती का-महामंडळे.